खरंच, आदमच्या सर्व मुलांची हृदये एका हृदयाप्रमाणे, परम दयाळू देवाच्या दोन बोटांमध्ये आहेत; तो त्याला हवे तसे निर्देशित करतो

अब्दुल्लाह इब्न अम्र इब्न अल-आस (अल्लाह त्याच्यावर आणि त्याच्या वडिलांवर प्रसन्न असो) यांनी सांगितले की त्यांनी अल्लाहचे रसूल (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना असे म्हणताना ऐकले: "खरंच, आदमच्या सर्व मुलांची हृदये एका हृदयाप्रमाणे, परम दयाळू देवाच्या दोन बोटांमध्ये आहेत; तो त्याला हवे तसे निर्देशित करतो " मग अल्लाहचे रसूल (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) म्हणाले: "अल्लाहुम्मा मुसरिफ अल-कुलूब सरिफ कुलुबाना
'अला ता'अतिक (हे अल्लाह, हृदयांना वळवणारा, आमच्या हृदयांना तुझ्या आज्ञापालनाकडे निर्देशित कर)."
[صحيح] [رواه مسلم]

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी सांगितले की, आदमच्या सर्व मुलांची हृदये एका हृदयासारखी, दयाळू अल्लाहच्या दोन बोटांच्या मध्ये आहेत; तो त्याला जसे हवे तसे निर्देशित करतो. जर तो इच्छितो तर तो हृदयाला सत्यावर दृढ ठेवतो आणि जर इच्छितो तर तो त्याला सत्यापासून दूर नेतो. सर्व हृदयांवर त्याचे नियंत्रण एका हृदयावर त्याचे नियंत्रण असल्यासारखे आहे, कारण काहीही त्याला कोणत्याही गोष्टीपासून विचलित करत नाही. मग पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अशी प्रार्थना केली की, हे अल्लाह, हृदयांना कधी आज्ञापालनाकडे, कधी अवज्ञाकडे, कधी स्मरणाकडे आणि कधी गाफीलतेकडे वळवणाऱ्या, आमच्या हृदयांना तुझ्या आज्ञापालनाकडे वळव.

http://sunnah.global/hadeeth/mr/show/6331